| |
|---|
| PUBLICATION – MAHARASHTRA TIMES |
| DATE – JANUARY 22, 2013 |
| PAGE NO – 13 |

# सिझन्स गोल्फ स्पर्धेत नौरथ-नाईक विजेते

**पुणे** : जे. एस. नौरथ आणि संजय नाईक यांच्या संघाने ४४ गुण मिळवत सिझन्स गोल्फ स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. सिझन्स अपार्टमेंट हॉटेल आणि नाईकनवरे डेव्हलपर्स यांच्या संयुक्त विद्यमाने सिझन्स गोल्फ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. जितू शहा आणि संजय भिंगारवाला यांचा संघ ४२ गुण मिळवत उपविजेता ठरला. स्पर्धेमध्ये एकूण १४४ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. सिझन्स गोल्फ स्पर्धेच्या विजेत्यांना नाईकनवरे डेव्हलपर्सच्या संचालिका गौरी नाईकनवरे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या वेळी नाईकनवरे डेव्हलपर्सचे संचालक रणजित नाईकनवरे व हेमंत नाईकनवरे, पूना गोल्फ क्लबचे कप्तान नरोतम चौधरी आणि पूना गोल्फ क्लबचे अध्यक्ष जयदीप पटवर्धन आदी उपस्थित होते.